**प्रकाशनयोग्य**

# भारताच्या सर्वोच्च न्यायालयात
# फौजदारी मूळ अधिकारिता

## स्वाधिकारे रिट याचिका ( फौ. ) क्र. २ / २०२०

## एन.आय. अधिनियम १८८१ चे कलम १३८ अन्वये
## खटल्यांची जलद सुनावणी : या प्रकरणात

## आदेश

**१.** दि. २७.०१.२००५ रोजी रक्कम रु. १,७०,०००/- साठी दोन धनादेश नाकारल्या संबधी विशेष अनुमती याचिका (फौजदारी) क्रमांक ५४६४/ २०१६. गेल्या १६ वर्षांपासून हा वाद प्रलंबित राहिला आहे. निगोशिएबल इंस्ट्रूमेंट्स अधिनियम ( यापुढे ‘ अधिनियम ’) च्या कलम १३८ अंतर्गत मोठ्या संख्येने दाखल केलेले खटले, विविध पातळ्यांवर प्रलंबित, असल्यामुळे, या न्यायालयाचे खंडपीठ ज्यात समावेश असलेले आम्ही दोघे ( भारताचे सरन्यायाधीश आणि न्या. एल. नागेस्वरा राव ) यांनी या प्रकरणांचा निपटारा होण्यास उशीर होण्याची कारणे तपासण्याचा निर्णय घेतला. नोंदणी शाखेला “ एन.आय. अधिनियम १८८१ चे कलम १३८ अंतर्गत दाखल खटल्यांची जलद सुनावणी ” या शीर्षकाखाली स्वाधिकारे रिट याचिकेची (फौजदारी) नोंदणी करावी असे निर्देश दिले होते . विद्वान वरिष्ठ वकील श्री. सिद्धार्थ लुथरा यांची एमिकस क्युरी ( न्यायमित्र ) म्हणून नियुक्ती करण्यात आली आणि त्यांना मदत करण्याची विनंती विद्वान वकील श्री. के. परमेश्वर यांना करण्यात आली होती. केंद्र सरकार, उच्च न्यायालयाचे महाप्रबंधक, राज्य

आणि केंद्रशासित प्रदेशाचे पोलीस महासंचालक, राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणचे सदस्य सचिव, बँकिंग संस्थेचे प्रतिनिधी म्हणून रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया आणि भारतीय बँका संघ, मुंबई यांना नोटिसा बजावण्यात आल्या होत्या.

२. विद्वान एमिकस क्युरी यांनी ११.१०.२०२० रोजी एक प्राथमिक अहवाल सादर केला जो सर्व उत्तरवादींना फिरवण्यात आला होता. दिनांक १९.०१.२०२१ रोजी, विद्वान एमिकस क्युरी यांनी या न्यायालयाला कळविले की, २५ पैकी केवळ १४ उच्च न्यायालयांनी प्राथमिक अहवालास आपले प्रतिसाद सादर केले होते. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने सुद्धा आपल्या सूचना दाखल केल्या होत्या. सात पोलिस महासंचालकांनी प्रतिज्ञापत्र सादर करून प्राथमिक अहवालात आपली मते मांडली होती. ज्या पक्षकारांनी आपले प्रतिसाद सादर केले नव्हते त्यांना आणखी मुदत देण्यात आली होती आणि हे प्रकरण अंतिम निकाल लावण्यासाठी २४.०२.२०२१ ही तारीख नेमली. सदर सुनावणीदरम्यान, भारताचे सरन्यायाधीश, न्या. एल. नागेस्वरा राव, न्या. एस. रवींद्र भट, यांचा समावेश असलेल्या तीन न्यायमूर्तींच्या खंडपीठाला असे वाटले की, या न्यायालयासमोर निर्धारित करण्यासाठी उपस्थित झालेले महत्त्वाचे मुद्दे लक्षात घेता या प्रकरणाचा विचार मोठ्या खंडपीठाने करणे आवश्यक होते. या न्यायालयाच्या काही न्यायिक अधिघोषणांचे स्पष्टीकरण करणे आवश्यक आहे असे विद्वान एमिकस क्युरी यांनी सादर केल्यामुळे हे प्रकरण सुद्धा मोठ्या खंडपीठाकडे पाठविणे आवश्यक होते. आम्ही, विद्वान एमिकस क्युरी, काही राज्यांचे वकील, भारताचे विद्वान सॉलिसिटर जनरल श्री. विक्रमजीत बॅनर्जी, विद्वान अतिरिक्त सॉलिसिटर जनरल श्री. रमेश बाबू, रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे वकील आणि इंडियन बँक्स असोसिएशनचे वकील डॉ. ललित भसीन यांचे म्हणणे ऐकले आहे.

३. कलम १३८ ते १४२ चा अंतर्भाव असलेले प्रकरण XVII ज्याचा समावेश सदर

अधिनियमात झाला आहे, ते दिनांक ०१.०४.१९८९ रोजी अंमलात आले. कलम १३८ अन्वये, अपुऱ्या रक्कमेमूळे नाकारलेल्या धनादेशांच्या प्रकरणात, एक वर्षाच्या कालावधीसाठी तुरुंगवास किंवा दंड जो धनादेशाच्या दुप्पट रक्कमेपर्यंत वाढवण्यात येऊ शकतो अश्या शिक्षेची तरतूद करण्यात आली होती. कलम १३९ मध्ये असे नमूद आहे की, प्राप्त धनादेश कोणत्याही कर्जाच्या किंवा इतर दायित्वाच्या पूर्ण किंवा अंशत: परतफेडीसाठी होता, असे धारकाच्या बाजूने गृहीत धरण्यात यावे. कलम १३८ अंतर्गतच्या खटल्यामध्ये जो बचाव मान्य करण्यात येऊ शकला नाही तो कलम १४० अंतर्गत शासित केलेला आहे. कलम १४१ हे कंपनीने केलेल्या गुन्हयांशी संबंधित आहे. ज्या गुन्ह्यांची दखल कलम १३८ अंतर्गत घेता येईल त्याबाबतच्या अटी कलम १४२ मध्ये देण्यात आल्या आहेत. सदर अधिनियमाच्या कलम १३८ अन्वये दाखल झालेल्या तक्रारी ज्यांचा निपटारा वाजवी कालावधीत होऊ शकला नाही आणि ज्या अनेक वर्षे प्रलंबित राहिल्या अशा तक्रारींचा न्यायालयात वर्षानुवर्षे खच पडलेला आहे.

४. या खूप मोठ्या प्रमाणात प्रलंबित असलेल्या तक्रारी ज्या निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट्स अधिनियमाच्या कलम १३८ अन्वये दाखल झालेल्या आहेत त्यांचा इतर फौजदारी खटल्यांचा निपटारा होण्यावर विपरीत परिणाम झाला आहे. परिस्थितीवर उपाययोजना करणे ही तात्काळची गरज होती जी निगोशिएबल इंस्ट्रूमेंट्स अधिनियम ( सुधारणा आणि किरकोळ तरतुदी ) अधिनियम, २००२ मध्ये संबोधित केली होती. कलम १४३ ते १४७ जे सदर अधिनियमात समाविष्ट करण्यात आले होते ते दिनांक ०६.०२.२००३ रोजी अंमलात आले. फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ ( यापुढे 'संहिता' ) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कलम १४३ हे न्यायालयाला सदर अधिनियमाच्या कलम १३८ अन्वये दाखल केलेल्या तक्रारींवर समरी पद्धतीने खटला चालविण्याचा अधिकार प्रदान करते. कलम १४३ च्या उपकलम (३) हे विहित करते की, तक्रार दाखल झाल्यापासून सहा महिन्यांच्या आत खटला पूर्ण करण्याचा प्रयत्न करावा. कलम

१४४ समन्सची बजावणी कश्या पद्धतीने करावी यांशी संबंधित आहे. कलम १४५ असे आधारतत्व मानते की, तक्रारदाराने प्रतिज्ञापत्रावर दिलेला पुरावा या संहिते अंतर्गत कोणतीही चौकशी, खटला किंवा इतर कार्यवाहीत पुरावा म्हणून वाचता येईल. कलम १४६ नुसार धनादेश नाकारला आहे हे दर्शविणारी बँकेची स्लिप किंवा मेमो हा धनादेश नाकारला आहे या वस्तुस्थितीचा प्रथमदर्शनी पुरावा मानला जातो. कलम १४७ नुसार सदर अधिनियम अंतर्गत दंडनीय गुन्हे हे आपसात मिटविण्याजोगे गुन्हे आहेत. सदर अधिनियमांतर्गत विहित केलेली शिक्षा एक वर्षावरून दोन वर्षांपर्यंत वाढविण्यात येणे आणि तसेच कलम १३८ ते १४२ मध्ये करण्यात आलेल्या इतर सुधारणा या गोष्टींचा इथे या प्रकरणाशी संबंध नाही.

**५.** सदर अधिनियमाच्या कलम १३८ अन्वये दाखल केलेल्या आणि मोठ्या प्रमाणात प्रलंबित असलेल्या तक्रारींशी न्यायालयाचा सतत संघर्ष सुरु असल्यामुळे सदर परिस्थिती सुधारली नाही. विद्वान एमिकस क्युरीने सादर केलेला प्राथमिक अहवाल असे दर्शवितो की, दिनांक ३१.१२.२०१९ रोजी एकूण २.३१ कोटी फौजदारी खटले प्रलंबित होते, त्यापैकी ३५.१६ लाख केसेस सदर अधिनियमाच्या कलम १३८ शी संबंधित होते. विद्वान एमिकस क्युरी यांच्या मते, केसेस साठून राहण्याचे कारण असे आहे की, जेव्हा दरवर्षी तक्रारी दाखल होण्यात सातत्याने वाढ होत आहे त्याप्रमाणात तक्रारी निकालात काढण्याचे प्रमाण दाखल हे होणाऱ्या तक्रारींच्या प्रमाणाशी जुळत नाही. सदर अधिनियमाच्या कलम १३८ अन्वये दाखल तक्रारी निकालात काढण्यात ज्या कारणांमुळे उशीर होतो त्याचा आपण या प्रकरणात विचार करू.

**६.** विद्वान एमिकस क्युरी यांनी राज्य सरकारे आणि केंद्रशासित प्रदेशांनी दाखल केलेल्या उत्तरांमधून जे मुख्य सात मुद्दे ओळखले ते
खालीलप्रमाणे आहेत:

क) समन्सची बजावणी

ख) संहितेच्या कलम २१९ मध्ये वैधानिक सुधारणा

ग) समरी ट्रायल

घ) बँक खाती जप्त करणे

ङ) संहितेचे कलम २०२ लागू करणे

च) मध्यस्थी

छ) दंडाधिकाऱ्यांचे अंगभूत अधिकारक्षेत्र

**७.** सदर अधिनियमाच्या कलम १३८ अन्वये दाखल तक्रारीतील आरोपींना समन्सची बजावणी करणे हे तक्रारी निकालात काढण्यात जो उशीर होतो त्याचे एक प्रमुख कारण आहे. विविध राज्य सरकारे आणि केंद्र शासित प्रदेश यांची उत्तरे तपासल्यानंतर विद्वान एमिकस क्युरी यांनी समन्स बजावणीला गती देण्यासाठी अनेक सूचना दिल्या आहेत. त्यांनी दिलेल्या काही सूचना, बँकेने धनादेशाच्या आदेशकाचा सध्याचा मोबाइल क्रमांक, ईमेल आयडी आणि टपालचा पत्ता जाहीर करणे, धनादेशाच्या मागील पानावर आदेशकाचा देण्यात आलेला तपशील जाहीर करणे, समन्सच्या इलेक्ट्रॉनिक बजावणीसाठी नोडल एजन्सी तयार करणे आणि नाकारलेल्या मेमोमधून युनिक नंबर तयार करणे, ह्या सदर अधिनियमाच्या कलम १४६ अन्वये बँकेकडून देण्यात येणाऱ्या नाकारलेल्या स्लिपशी संबंधित आहेत. केंद्र सरकार आणि रिझर्व्ह बँक ऑफ इंडीया यांना विद्वान एमिकस क्युरी यांनी या बाबींवर केलेल्या सूचनांवर त्यांचे प्रतिसाद सादर करण्याचे निर्देश दिले होते. दिनांक १०.०३.२०२१ रोजी, भारताचे विद्वान सॉलिसिटर जनरल आणि भारतीय रिझर्व्ह बँकेचे विद्वान वकील श्री. रमेश बाबू यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर, या न्यायालयाला असे योग्य वाटले की, न्यायासाठी प्रलंबित खटले हे अतिप्रमाणात साचून राहू नयेत यासाठी केलेल्या विविध सूचनांवर विचार करण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती माननीय श्री. आर. सी. चव्हाण यांचे अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात यावी. वरील

नमूद समितीने, धनादेशाच्या रकमेच्या मर्यादेपर्यंत बँक खाती जप्त करणे, समन्सपूर्व मध्यस्थी आणि इतर सर्व मुद्दे जे प्राथमिक टिपणाचा भाग आहेत, याबाबत विद्वान एमिकस क्युरी यांनी केलेल्या शिफारशी आणि विद्वान एमिकस क्युरी यांनी सादर केलेले लेखी म्हणणे आणि त्याचबरोबर इतर संबंधित मुद्दे जे अशा विचारादरम्यान उद्भवू शकतात यांचा विचार करावा. सदर अधिनियमाच्या कलम १३८ अन्वये दाखल तक्रारी चालवण्यासाठी अतिरिक्त न्यायालयांची निर्मिती करण्याची गरज यावर विचार करण्याचे निर्देश समितीला देण्यात आले आहेत.

**समरी ट्रायल चे समन्स ट्रायल मध्ये यांत्रिक रूपांतरण**

८. विद्वान एमिकस क्युरी यांनी असे सादर केले की, सदर अधिनियमाच्या कलम १४३ मध्ये अशी तरतूद आहे की, संहितेचे कलम २६२ ते २६५ हे सदर अधिनियमाच्या प्रकरण XVII खालील सर्व गुन्हे चालविण्यासाठी लागू होतील. जर दंडाधिकारी यांच्या मते एक वर्षापेक्षा जास्त कारावासाची शिक्षा ठोठवावी लागत असेल किंवा समरी ट्रायलने खटला चालवणे अनुचित आहे, तर दुसरे परंतुक कारणांची नोंद करून समरी ट्रायलचे रूपांतर समन्स ट्रायलमध्ये करण्याचा अधिकार त्यांना प्रदान करते. विद्वान एमिकस क्युरी यांनी या न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले आहे की, समरी ट्रायल ह्या नियमितपणे यांत्रिक पद्धतीने समन्स ट्रायल मध्ये रूपांतरित केल्या जातात. त्यांच्या प्राथमिक टिपणामध्ये त्यांनी सूचना केल्या आहेत की, समरी ट्रायलचे समन्स ट्रायलमध्ये रूपांतर करण्यापूर्वी ठोस आणि पुरेशी कारणे नोंदविण्यासाठी उच्च न्यायालयांनी ट्रायल कोर्टांना कार्यवाहीचे निर्देश द्यावेत, ज्या उच्च न्यायालयाने मान्य केल्या आहेत.

९. सदर अधिनियमाच्या कलम १३८ अन्वये दाखल झालेल्या तक्रारींचा जलद निपटारा करण्यासाठी एक पाऊल म्हणून कलम १४३ चा परिचय सदर अधिनियमात २००२ साली करून

देण्यात आला आहे. या टप्प्यावर, समरी ट्रायलशी संबंधित असलेल्या संहितेच्या प्रकरण XXI चा संदर्भ घेणे आवश्यक आहे. ज्या खटल्यात आरोपी गुन्हा कबूल करत नाही, अश्या समरी पध्दतीने चालवल्या जाणाऱ्या खटल्यात दंडाधिकाऱ्यांसाठी पुराव्याचे सार याची नोंद करणे आणि निकाल ज्यामध्ये त्याच्या निष्कर्षांच्या कारणांचे थोडक्यात निवेदन असेल असा देणे, हे पुरेसे असते. कलम २६२ अन्वये ची समरी ट्रायलची प्रक्रिया कोणत्याही तीन महिन्यांपेक्षा जास्त कारावासाच्या शिक्षेसाठी लागू करता येणार नाही, असा प्रतिबंध आहे. तथापि, संहिते मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, सदर अधिनियमाच्या प्रकरण XVII अंतर्गत गुन्ह्याच्या खटल्यासाठी संहितेचे कलम २६२ ते २६५ " शक्य तितके " लागू करण्यात आले होते. हे फक्त अशा प्रकरणात आहे जिथे दंडाधिकारी यांच्या मते आरोपीला एका वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी शिक्षा सुनावणे आवश्यक असू शकते जेथे तक्रार ही समन्स ट्रायल म्हणून चालविली जाईल. विविध उच्च न्यायालयांकडून आलेल्या प्रतिसादांमधून हे स्पष्ट होते की, ट्रायल कोर्टांनी कलम १३८ अन्वये दाखल केलेल्या तक्रारींचे समरी ट्रायल मधून समन्स ट्रायलमध्ये केलेले रूपांतरण हे यांत्रिकपणे कोणतीही कारणे न नोंदविता केलेले आहे. कलम १३८ अन्वये दाखल केलेल्या तक्रारींचे अशाप्रकारे समरी ट्रायल मधून समन्स ट्रायलमध्ये रूपांतर केल्यामुळे खटले निकाली काढण्यास उशीर होत आहे. पुढे, कलम १४३ मधील दुसरा परंतुक हा दंडाधिकाऱ्यांना अशा रूपांतरणाची कारणे सांगणारा आदेश नोंदवावा लागेल, असे बंधनकारक करतो. या अधिनियमाच्या कलम १४३ चा उद्देश हा आहे की, संहितेअंतर्गत समरी ट्रायलसाठी विहित केलेल्या प्रक्रियेचे शक्य तितक्या प्रमाणात पालन करून कलम १३८ अंतर्गत दाखल तक्रारींचा त्वरित निपटारा करणे. कलम १४३ च्या दुसऱ्या परंतुक अन्वये दंडाधिकाऱ्यांना प्रदान केलेले स्वेच्छाधिकार हे योग्य काळजी आणि सावधगिरीने, तक्रारींचे समरी ट्रायल मधून समन्स ट्रायलमध्ये रूपांतरित करण्याची कारणे नोंदविल्यानंतर वापरायला हवेत. अन्यथा सदर अधिनियमाच्या कलम १४३ चा परिचय ज्या हेतूसाठी केला आहे तो निष्फळ ठरेल. आम्ही उच्च न्यायालयांबरोबर सल्लामसलत करून

विद्वान एमिकस क्युरी यांनी केलेल्या सूचना स्वीकारतो. उच्च न्यायालये दंडाधिकारी यांना असे कार्यवाहीचे निर्देश देऊ शकतात की, त्यांनी सदर अधिनियमाच्या कलम १४३ मधील दुसऱ्या परंतुक अन्वये अधिकाराचा वापर करून कलम १३८ अंतर्गत दाखल तक्रारींच्या खटल्यांचे समरी ट्रायलमधून समन्स ट्रायलमध्ये रुपांतर करण्यापूर्वी कारणे नोंदवावीत.

**<u>संहितेच्या कलम २०२ अन्वये सदर अधिनियमाच्या  कलम १४५ शी संबंधित चौकशी</u>**

**१०.** आदेशिका काढणे न्याय्य असल्याची पुरेशी कारणे दिली आहेत हे ठरविण्यासाठी चौकशी करण्याचे अधिकारक्षेत्र  दंडाधिकाऱ्यांना संहितेच्या कलम २०२ अंतर्गत देण्यात आले आहे. दिनांक २३.०६.२००६ पासून संहितेच्या कलम २०२ मध्ये केलेली सुधारणा,  २००५ चे अधिनियम २५ अन्वये ज्या प्रकरणात आरोपी न्यायालयाच्या अधिकारक्षेत्राच्या पलीकडे राहतो अशा प्रकरणात दंडाधिकारी यांना आदेशिका काढण्यापूर्वी चौकशी करणे बंधनकारक केले गेले आहे. ( पहा : **विजय धानुका आणि इतर वि. नजीमा  ममताज आणि  इतर**[1], **अभिजित  पवार वि. हेमंत मधुकर निंबाळकर आणि अन्य एक**[2] **आणि बिर्ला कॉर्पोरेशन  लिमिटेड  वि. ॲडव्हेंट्झ इन्व्हेस्टमेंट्स अँड होल्डिंग्स लिमिटेड आणि इतर.**[3]).  सदर अधिनियमाच्या कलम १३८ अन्वये दाखल करण्यात आलेल्या तक्रारींबाबत कलम २०२ लागू करण्याबाबत उच्च न्यायालयांमध्ये मतभिन्नता निर्माण झालेली आहे. संहितेच्या कलम २०२ मधील तरतुदीनुसार, कलम १३८ अन्वये दाखल तक्रारींमध्ये आदेशिका काढण्यापूर्वी दंडाधिकाऱ्यांनी चौकशी करणे बंधनकारक आहे, असे मत कायम ठेवत उच्च न्यायालयाने कलम १३८ अंतर्गत दाखल काही प्रकरणांचा निकाल दिला आहे. इतर काही प्रकरणांमध्ये उलट मते व्यक्त करण्यात आली आहेत. असे गृहीत

1 ( २०१४) १४ एस सी सी ६३८

2 ( २०१७ ) १६ एस सी सी ६१०

3 ( २०१६ ) ११ एस सी सी  १०५

धरण्यात आले की,  केवळ आरोपी न्यायालयाच्या अधिकारक्षेत्राच्या पलीकडे राहत असल्याने दंडाधिकाऱ्यांनी प्रत्येक प्रकरणातील आदेशिका काढण्याची प्रक्रिया पुढे ढकलणे  आवश्यक नाही आहे. पुढे असेही गृहीत धरण्यात आले की, जर रेकॉर्डवर उपलब्ध असलेल्या साहित्यातून आवश्यक ते समाधान मिळू शकेल तर, संहितेच्या कलम २०२ अन्वये चौकशी न केल्यास ते आदेशिका काढण्याच्या  प्रक्रियेत अडथळा आणणार नाही.

**11.** विद्वान एमिकस क्यूरी यांनी या न्यायालयाच्या **के. एस. जोसेफ विरुद्ध फिलिप्स कार्बन ब्लॅक लिमिटेड आणि अन्य एक**[4] मधील न्यायनिर्णयाचा संदर्भ दिला ज्यामध्ये  कलम १३८ अन्वये दाखल झालेल्या तक्रारींच्या संदर्भात संहितेच्या कलम २०२ अन्वये चौकशीची आवश्यकता यावर चर्चा झाली  पण  विधिविषयक  मुद्दा खुला ठेवण्यात आला होता.  या न्यायालयाचा **विजय धानुका** (उपरोल्लेखित), **अभिजित पवार** (उपरोल्लेखित) आणि **बिर्ला कॉर्पोरेशन** (उपरोल्लेखित) मधील न्यायनिर्णय लक्षात घेता, न्यायालयाच्या अधिकारक्षेत्राबाहेर राहणाऱ्या आरोपींना समन्स बजावण्यापूर्वी दंडाधिकाऱ्यांमार्फत करावयाची चौकशी ही, थांबविता येणार नाही. विद्वान एमिकस क्यूरी यांनी असा सल्ला दिला की, दंडाधिकाऱ्यांनी चौकशी केल्यानंतर असा निष्कर्ष काढावा कि, आरोपीं विरुध्द  कारवाई करण्यासाठी पुरेशी करणे आहेत. आम्ही विद्वान एमिकस क्यूरी यांच्याशी सहमत  आहोत.

**12.** आणखी एक मुद्दा आमच्या निदर्शनास आणून देण्यात आला आहे तो कलम २०२ (२) च्या स्पष्टीकरणाशी संबंधित आहे ज्यात असे नमूद केले आहे की, आदेशिका काढण्यासाठी, कलम २०२ (१) अंतर्गत करण्यात येणाऱ्या चौकशीत दंडाधिकारी हे साक्षीदाराचा पुरावा शपथेवर घेतील. संहिते मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, सदर अधिनियमाच्या कलम १४५ मध्ये अशी तरतूद आहे की, तक्रारदार त्याचा पुरावा प्रतिज्ञापत्रावर देऊ शकतो, जो कोणतीही चौकशी,

---

4. (२०१६) ११ एस सी सी १०५

न्यायचौकशी किंवा इतर कार्यवाही यांमधील पुराव्यात वाचला जाईल. सदर अधिनियमाचे कलम १४५ (२) हे सरकारी पक्षाच्या किंवा आरोपीच्या अर्जावर, पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रातील वस्तुस्थितींबाबत पुरावा देणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला समन्स बजावून त्याची तपासणी करण्यास न्यायालयास सक्षम बनवते. विद्वान एमिकस क्युरी यांनी युक्तिवाद केला आहे की, साक्षीदारांची तपासणी प्रतिज्ञापत्रावर करण्याची परवानगी देणारी कोणतीही विशिष्ट तरतूद नसली तरी, कलम २०२ अन्वये चौकशीसाठी, तक्रारदाराची तपासणी ही प्रतिज्ञापत्राद्वारे करण्याची परवानगी कलम १४५ देते. त्यांनी असे सुचविले की, कलम १४५ सोबत कलम २०२ (२) वाचावे आणि कलम १३८ अन्वये दाखल तक्रारींच्या संदर्भात साक्षीदारांची तपासणी ही प्रतिज्ञापत्रावर सुध्दा घेण्यास परवानगी द्यावी. केवळ अपवादात्मक प्रकरणांमध्ये, दंडाधिकारी हे साक्षीदारांची वैयक्तिकरित्या तपासणी करू शकतील. सदर अधिनियमाचे कलम १४५ हे प्रतिज्ञापत्राद्वारे तक्रारदाराची तपासणी करण्यासंदर्भात, कलम २०२ ला अपवाद आहे. कलम १४५ मध्ये साक्षीदारांची तपासणी ही प्रतिज्ञापत्रावर सुध्दा करण्यासंदर्भात विशेष तरतूद नाही. हे स्पष्ट होते की, सन २००३ पासून कलम १४५ हे, कलम १३८ अन्वये दाखल झालेल्या तक्रारींच्या न्यायचौकशीला गती देण्याच्या स्तुत्य हेतूने सदर अधिनियमात सन २००३ पासून समाविष्ट करण्यात आले होते. जर तक्रारदाराने त्याचा पुरावा प्रतिज्ञापत्रावर दिला, तर मग साक्षीदारांचा शपथेवर पुरावा घेण्यात यावा असा आग्रह धरण्याचे कारण नाही. कलम २०२ सोबत कलम १४५ चे समग्र वाचन केल्यावर आम्ही असे मानतो की, संहितेचे कलम २०२ (२) हे शपथेवर साक्षीदारांची तपासणी करण्यासंदर्भात ज्या तक्रारी कलम १३८ अन्वये दाखल आहेत अशा तक्रारींना लागू होत नाही. तक्रारदाराच्या वतीने साक्षीदारांचे पुरावे प्रतिज्ञापत्रावर ग्राह्य धरले जातील. जर दंडाधिकाऱ्यांनी स्वत: चौकशी केली तर, त्यांनी साक्षीदार तपासावेत हे अनिवार्य नाही. योग्य प्रकरणांमध्ये, दंडाधिकारी हे कलम २०२ अंतर्गत कार्यवाहीसाठी पुरेशी कारणे आहेत याचे समाधान होण्यासाठी कागदपत्रांची तपासणी करू शकतात.

**<u>संहितेचे कलम २१९ आणि २२०</u>**

**१३.** संहितेच्या कलम २१९ मध्ये अशी तरतूद आहे की, जेव्हा एखाद्या व्यक्तीवर १२ महिन्यांच्या कालावधीत एकाच प्रकारचे एकापेक्षा जास्त गुन्हे दाखल केल्यास त्याच्यावर अशाप्रकारच्या जास्तीत जास्त तीन गुन्ह्यांसाठी एका न्यायचौकशीमध्ये खटला चालविला जाऊ शकतो. कलम २२० नुसार जर एकाच व्यक्तीने एकापेक्षा जास्त गुन्हे एकाच कृत्यांच्या मालिकेत अशा प्रकारे एकाच घडामोडीचा भाग म्हणून सोबत केले असतील तर, एकाच न्यायचौकशीमध्ये त्यांच्यावर आरोप लावून खटला चालवला जाऊ शकतो. विद्वान एमिकस क्युरी यांनी त्यांच्या प्राथमिक अहवालामध्ये असे सुचविले आहे की, जेथे एका उद्देशासाठी धनादेश देण्यात आलेले आहेत तेथे कार्यवाहींची बहुविधता टाळण्यासाठी संहितेच्या कलम २१९ मध्ये कायदेविषयक सुधारणा आवश्यक आहे. विद्वान एमिकस क्यूरी यांनी असे सादर केले आहे की, जोपर्यंत संहितेच्या कलम २२० शी संबंध आहे, एकाच घडामोडीचा एक भाग म्हणून केलेले सारखे /तत्सम गुन्हे हे एकाच न्यायचौकशीचा विषय असू शकतात. विद्वान एमिकस क्यूरी यांनी असा युक्तिवाद केला होता की, संहितेचे कलम २२० (१) हे कलम २१९ द्वारे नियंत्रित केले जात नाही आणि जरी एकाच घडामोडी संदर्भात तीनपेक्षा जास्त गुन्हे असले तरी संयुक्त खटला चालविला जाऊ शकतो. या न्यायालयाचा **बलबीर विरुद्ध हरयाणा राज्य आणि अन्य एक**[5] या न्यायनिर्णयामध्ये भिस्त ठेवण्यात आली होती ती असा युक्तिवाद करण्यासाठी की, एकाच घडामोडीचा एक भाग म्हणून आरोपीने केलेले सर्व अभिकथित गुन्हे, जरी ते गुन्हे एखाद्या मोठ्या कटाचा भाग म्हणून केले गेले असतील तरीही, ते एकाच खटल्यात सोबत चालवता येतील.

**१४.** विद्वान एमिकस क्यूरी यांनी असे निदर्शनास आणून दिले आहे की, या न्यायालयाच्या

5 (२०००) १ एस सी सी २८५

**वाणी ॲग्रो एंटरप्रायझेस वि. गुजरात राज्य आणि इतर**[6] मधील न्यायनिर्णयाचे स्पष्टीकरण गरजेचे आहे. **वाणी ॲग्रो** (उपरोल्लेखित) मध्ये ह्या न्यायालयाने चार तक्रारी ज्यात, चार धनादेश नाकारल्या विषयीचे प्रकरण हाताळले होते. त्यात सर्व चार प्रकरणांचे एकत्रीकरण करणे या संबंधित प्रश्न उपस्थित केला होता. संहितेच्या कलम २१९ नुसार एकाच वेळी फक्त तीनच खटले सोबत चालवता येत असल्याने या न्यायालयाने चारही खटले एकाच तारखेला निश्चित करण्याचे निर्देश ट्रायल कोर्टाला दिले. संहितेच्या कलम २१९ अंतर्गत जे निर्देश दिले आहेत ते लक्षात घेता, या न्यायालयाने **वाणी ॲग्रो** ( उपरोल्लेखित ) मध्ये अवलंबलेली पध्दत ही योग्य आहे. म्हणूनच कोणत्याही स्पष्टीकरणाची गरज नाही, विशेषत: कलम २१९ मध्ये योग्य ती सुधारणा करण्यात यावी हे विद्वान एमिकस क्युरी यांनी सादर केलेले म्हणणे लक्षात घेता. कलम १३८ अन्वये येणाऱ्या तक्रारींच्या संदर्भात १२ महिन्यांच्या कालावधीत एकाच प्रकारच्या तीनपेक्षा अधिक गुन्ह्यांचा एकच खटला चालवणे हे केवळ सुधारणांद्वारेच शक्य होऊ शकतो, या विद्वान एमिकस क्युरी यांच्या म्हणण्यात आम्हाला तथ्य आढळून आले आहे. फौजदारी न्यायालयांवरील ताण कमी करण्यासाठी, आम्ही अशी शिफारस करतो की, संहितेच्या कलम २१९ मध्ये निर्बंध असूनही, कलम १३८ अन्वये दाखल केलेल्या एकाच प्रकारच्या गुन्ह्यांसाठी एखाद्या व्यक्तीवर १२ महिन्यांच्या कालावधीत खटला चालवता येईल, अशी तरतूद अधिनियमात करण्यात यावी.

**१५.** संहितेच्या कलम 220 नुसार एकाच घडामोडीचा एक भाग म्हणून केलेले गुन्हे हे एकाच खटल्यात संयुक्तपणे चालवता येतील. " एकाच घडामोडीत " म्हणजे काय याची व्याख्या संहितेत कोठेही दिलेली नाही. खरंतर, या उक्तीचा नेमका अर्थ काय आहे हे स्पष्ट करणे नेहमीच कठीण असते. एखादी घडामोड सारखी मानली जाऊ शकतो की नाही हे प्रत्येक प्रकरणातील विशिष्ट तथ्यांवर अवलंबून असेल आणि कायदेमंडळाने जाणीवपूर्वक ज्याची व्याख्या सोडून दिली

6 २०१९ (१०) एस सी जे २३८

आहे त्या गोष्टींची व्याख्या करणे आम्हाला अवघड वाटते. व्याख्या करण्याचे अवघड काम हाती घेतलेल्या एकाही न्यायालयाचा एकही निर्णय आमच्यासमोर आलेला नाही. परंतु सर्वसाधारणपणे असा विचार केला जातो की, जिथे वेळेची किंवा ठिकाणाची किंवा हेतूची आणि बेताची एकता किंवा कृतीचे सातत्य हे एकाच कृत्याच्या मालिकेच्या संदर्भात आहे, तेथे ते एकाच घडामोडीचा भाग आहेत असे अनुमान काढणे शक्य आहे. तथापि, घडामोडी समान मानण्यासाठी या प्रत्येक घटकाचे सहअस्तित्व असणे आवश्यक नाही. परंतु जर एखाद्या व्यक्तीने केलेल्या अनेक कृत्यांमध्ये हेतू किंवा बेताची एकता दर्शविली गेली तर ती कृत्ये एकाच घडामोडीचा भाग आहेत हे दर्शविण्यासाठी एक मजबूत परिस्थिती असेल[7]. कलम २२० मध्ये कोणतीही संदिग्धता नाही ज्यानुसार एकाच घडामोडीचा  एक भाग म्हणून जारी केलेले अनेक धनादेश एकाच न्यायचौकशीचा विषय असू शकतात.

**१६.** विद्वान एमिकस क्युरी यांनी आमच्या असे निदर्शनास आणून दिले आहे की, एकाच घडामोडीचा भाग असलेले धनादेश नाकारले गेले त्यासाठी  सदर अधिनियमाच्या कलम १३८ अन्वये स्वतंत्र तक्रारी दाखल केल्या जातात. समन्स बजावण्यात होणारा अवाजवी विलंब हे, न्यायालयात कलम १३८ अन्वये  दाखल केलेल्या तक्रारी प्रमाणाबाहेर जमा होण्याचे मुख्य कारण आहे. विद्वान एमिकस क्युरी यांनी असे  सुचवले की, समन्सच्या बजावणीसाठी लागणारा वेळ कमी करण्याचा एक मार्ग म्हणजे एका घडामोडीशी संबंधित असलेल्या एका तक्रारीत करण्यात आलेली समन्सची बजावणी ही सदर घडामोडी संदर्भातील सर्व तक्रारींसाठी ची बजावणी झाली आहे असे मानणे. विद्वान एमिकस क्युरी यांनी केलेल्या सूचनेशी आम्ही सहमत आहोत. त्यानुसार उच्च न्यायालयांना विनंती आहे की, त्यांनी ट्रायल कोर्टाला असे कार्यवाहीचे निर्देश द्यावेत की, एकाच घडामोडीचा भाग असलेल्या एका तक्रारीत केलेली समन्सची बजावणी ही एकाच

---

7 आंध्र प्रदेश राज्य वि. चिमलापती गनेस्वरा राव  अँड अन्य एक ,    (१९६४ ) ३ एस सी आर २९७

न्यायालयात दाखल झालेल्या सर्व तक्रारी ज्या सदर घडामोडीचा एक भाग म्हणून जारी करण्यात आलेले धनादेश नाकारल्या संदर्भात आहेत, अशा सर्व तक्रारींमध्ये समन्सची बजावणी झाली आहे असे मानावे.

<u>**दंडाधिकाऱ्यांचे अंगभूत अधिकार**</u>

**१७. के. एम. मॅथ्यू वि. केरळ राज्य आणि अन्य एक**[8], यामध्ये या न्यायालयाने संहितेच्या कलम २०४ अंतर्गत बजावणी केलेल्या समन्सला प्रतिसाद म्हणून आरोपी हजर झाल्यानंतर, दंडाधिकाऱ्याला संहितेच्या प्रकरण XX अंतर्गत असलेल्या अधिकाराचा विषय हाताळला आहे. असे गृहीत धरण्यात आले होते की, आरोपी दंडाधिकाऱ्यांसमोर अशी बाजू मांडू शकतो की, त्याच्याविरुद्ध आदेशिका काढली जाऊ नये आणि जर दंडाधिकारी यांनी तक्रारीच्या पुनर्विचार केला की, आरोपीवर खटला चालवता येईल असा कोणताही गुन्हा नाही आणि त्यांचे समाधान झाले तर, ते ती कार्यवाही रद्द करू शकतात. या न्यायालयाचे असे मत होते की, दंडाधिकाऱ्यांना कार्यवाही रद्द करण्यासाठी विशिष्ट तरतुदीची आवश्यकता नाही आणि आदेशिका जारी करण्याचा आदेश हा अंतरिम आदेश आहे आणि न्यायनिर्णय नाही, म्हणून तो बदलला जाऊ शकतो किंवा परत मागवला जाऊ शकतो. **के. एम. मॅथ्यू** ( उपरोल्लेखित ) या केसमध्ये केलेले निरीक्षण की, आदेशिका जारी करण्याचा चुकीचा आदेश परत मागविण्यासाठी कायद्याच्या विशिष्ट तरतुदीची आवश्यकता नाही हे **अदालत प्रसाद विरुद्ध रूपलाल जिंदल आणि इतर** [9] या केसमध्ये संहितेच्या योजनेच्या विरुद्ध असल्याचे मानले गेले होते. त्यात असे निरीक्षण करण्यात आले होते की, संहितेच्या कलम ४८२ अन्वये दखल घेण्यासाठीचा आदेश हा फक्त कार्यवाहीचा विषय ठरू

8 (१९९२) १ एस सी सी २१७

9 (२००४) ७ एस सी सी ३३८

शकतो कारण दुय्यम फौजदारी न्यायालयांना अंगभूत अधिकार नसतो. संहितेद्वारे पुनर्विलोकनाचे अधिकारही ट्रायल कोर्टांना प्रदान केलेले नाहीत. ट्रायल कोर्टाने दिलेला चुकीचा आदेश मागे घेण्याची कोणतीही विशिष्ट तरतूद नसल्याने, **के. एम. मॅथ्यू** (उपरोल्लेखित ) या केसमधील न्यायनिर्णय हा योग्य कायदा मांडत नाही, असे गृहीत धरण्यात आले होते. समन्स प्रकरणात एखादी व्यक्ती आरोपातून मुक्तता करण्याची मागणी करू शकते का, हा मुद्दा या न्यायालयाने **सुब्रमण्यम सेथुरमन विरुद्ध महाराष्ट्र राज्य व अन्य एक** [10] या केसमध्ये विचारात घेतला होता. **अदालत प्रसाद** (उपरोल्लेखित ) मध्ये घालून दिलेल्या कायद्याचा पुनरुच्चार करण्यात आला होता.

**१८.** विद्वान एमिकस क्युरी यांनी असा युक्तिवाद केला होता की, सदर अधिनियमाच्या कलम १३८ अन्वये दाखल केलेल्या तक्रारींच्या संदर्भात, ट्रायल कोर्टाद्वारे जारी केलेल्या आदेशिकेचे पुनर्विलोकन किंवा परत मागविण्यासाठी अधिकार प्रदान करण्यासाठी संहितेच्या कलम २५१ आणि २५८ यांचे सदर अधिनियमाच्या कलम १४३ सोबत समग्र वाचन करण्याचा विचार केला जावा. त्यांनी या न्यायालयाच्या **मीटर्स आणि इन्स्ट्रुमेंट्स प्रायव्हेट लिमिटेड आणि अन्य एक वि. मेहता** [11] मधील न्यायनिर्णयाचा संदर्भ दिला, जे खालीलप्रमाणे वाचावे :

हे जरी खरे असले की , सुब्रमण्यम सेथुरामन वि. महाराष्ट्र राज्य मध्ये या न्यायालयाने असे निरीक्षण नोंदवले की, सीआरपीसी च्या कलम २५२ अंतर्गत एकदा आरोपीची कबुली नोंदविल्यानंतर, सीआरपीसी च्या प्रकरण XX मध्ये अंतर्भूत प्रक्रिया ही खटल्याला तार्किक निष्कर्षापर्यंत नेण्यासाठी अनुसरली जावी, सदर न्यायनिर्णय हा २००२ मध्ये केलेल्या सुधारणेपूर्वी अस्तित्वात असलेल्या वैधानिक तरतुदी नुसार देण्यात आला होता. २००२ च्या सुधारणेनंतरची वैधानिक योजना जी, मांडवी सहकारी बँक आणि जे. व्ही. बहारुनी या प्रकरणात विचारात

10 (२००४) १३ एस सी सी ३२४

11 (२०१८) १ एस सी सी ५६०

घेण्यात आली आणि जिच्यामुळे कायद्यामध्ये बदल घडून आलेला आहे, तिला मान्यता देणे गरजेचे आहे. २००२ च्या सुधारणेनंतर, सदर अधिनियमाच्या कलम १४३ अंतर्गत जर तक्रारदाराला न्यायालयाच्या समाधानानुसार नुकसान भरपाई दिली आणि जेथे आरोपी न्यायालयाच्या मूल्यांकनानुसार व्याज आणि खटल्याचे वाजवी किंमत यासहित चेकची रक्कम देतो तेथे आरोपीची निर्दोष मुक्तता करण्याचा निहित अधिकार दंडाधिकाऱ्यांना देण्यात आला आहे. अशाप्रकारचा अर्थ कायदेमंडळाच्या हेतूशी सुसंगत होता. न्यायालयाने तक्रारदार आणि आरोपी यांच्या हक्कांचा समतोल साधला पाहिजे आणि न्याय मिळवण्याचे मार्ग हे देखील वाढविले पाहिजेत. कायद्याचा मूळ उद्देश हा आहे की, धनादेशाचा आदेशक ज्याचे वर्तन वाजवी आहे किंवा जिथे तक्रारदाराला नुकसान भरपाई मिळण्यामुळे न्याय मिळतो, त्याला शिक्षा देण्याचा उद्देश न ठेवता, तक्रारदारास जलद उपाय योजना पुरवून धनादेश व्यवहारांची विश्वासार्हता वाढविणे. न्यायालय हे सदर अधिनियमाच्या कलम १४३ अंतर्गत असलेल्या आपल्या अंगभूत अधिकाराचा वापर करून योग्य तो आदेश देऊ शकते जो पक्षकारांच्या संमतीने आपापसात प्रकरण मिटविण्यापेक्षा वेगळा आहे. अशा प्रकारे, सीआरपीसी चे कलम २५८, जे स्पष्टपणे सांगायचे तर तक्रार प्रकरणांना लागू होत नाही, समन्स प्रकरणांमध्ये कार्यवाही थांबविणे शक्य करते, कारण सीआरपीसीच्या तरतुदी ज्या " शक्य तितक्या " लागू आहेत, त्यांचे तत्त्व सदर अधिनियमाच्या कलम १४३ खालील तक्रार प्रकरणांना लागू होते जे समरी ट्रायल तरतुदींना शक्य तितक्या म्हणजे अशा विचलनासह लागू करण्याचे योजते, ते संदर्भातील जलद सुनावणीसाठी आवश्यक आहे ."

१९. **मीटर्स आणि इन्स्ट्रुमेंट्स** ( उपरोल्लेखित ) मध्ये या न्यायालयाचे असे मत होते की, सदर अधिनियमाच्या कलम १४३ अंतर्गत जर तक्रारदाराला न्यायालयाच्या समाधानानुसार नुकसान भरपाई दिली तर आरोपीला दोषमुक्त करण्याचा निहित अधिकार दंडाधिकाऱ्यांना देण्यात आला

आहे. याच साधर्म्याने, असे गृहीत धरण्यात आले होते की, पक्षकारांच्या संमतीने आपआपसात प्रकरण मिटविण्या व्यतिरिक्त, ट्रायल कोर्टाला त्याच्या अंगभूत अधिकाराचा वापर करून कलम १४३ अन्वये योग्य ते आदेश देण्याचे अधिकारक्षेत्र आहे. या न्यायालयाने, ट्रायल कोर्टांना योग्य आदेश देण्याचा अधिकार प्रदान करण्यासाठी संहितेच्या कलम २५८ वर भिस्त ठेवली होती.

**२०.** सदर अधिनियमाचा कलम १४३ असे बंधनकारक करतो की, कलम १३८ अंतर्गत दाखल तक्रारींच्या न्याचौकशीसाठी संहितेच्या समरी ट्रायलच्या तरतुदी "शक्य तितक्या" लागू होतील. संहितेचे कलम २५८ दंडाधिकाऱ्यांना असे अधिकार प्रदान करते की, लेखी स्वरूपात कारणे नोंदवून कोणत्याही टप्प्यावर कार्यवाही थांबविणे आणि तक्रारीव्यतिरिक्त दाखल केलेले अन्य कोणतेही समन्स प्रकरण यात निर्दोष मुक्तता केल्याचा न्यायनिर्णय अधिघोषीत करणे . संहितेचे कलम २५८ हे तक्रारीवर दाखल केलेल्या समन्स प्रकरणात लागू होत नाही. त्यामुळे, सदर अधिनियमाच्या कलम १३८ अन्वये दाखल करण्यात आलेल्या तक्रारींच्या बाबतीत कलम २५८ लागू होऊ शकत नाही. या न्यायालयाने **मीटर्स आणि इन्स्ट्रुमेंट्स** ( उपरोल्लेखित ) यामध्ये दिलेला न्यायनिर्णय जो ट्रायल कोर्टाला एखाद्या आरोपीला दोषमुक्त करण्याचे अधिकार प्रदान करतो तिथपर्यंत चांगला कायदा नाही. सदर अधिनियमाच्या कलम १४३ मधील " शक्य तितके " या शब्दांची घेतलेली पुष्टी अयोग्य आहे. अधिनियमाच्या कलम १४३ मधील " शक्य तितके " हे शब्द केवळ संहितेच्या कलम २६२ ते २६५ लागू करणे आणि प्रकरण XVII अंतर्गत अनुसरण्यात येणाऱ्या समरी पद्धतीची न्यायचौकशी याबाबतीत वापरले जातात. तरतुदींमधील काही शब्द वाचून न्यायालयाला अधिकार प्रदान करणे हे अननुज्ञेय आहे. न्यायाधिशांनी एखाद्या कायद्याचे पुनर्लेखन, ना विस्तारित ना आकुंचित करून करू नये. कितीही प्रलोभने, धोरण तयार करणाऱ्यांच्या मुसद्देगिरीतून सूज्ञपणे सूचित होऊ शकत असली, त्याची रचना करताना प्रक्षिप्त

मजकूर आणि विस्थापन टाळले पाहिजे. त्यांनी निर्मितीच्या दृष्टीने वाचन करू नये[12] . न्यायाधीशाचे कर्तव्य हे, न्याय काय मागतो याबाबत न्यायाधीशांच्या कल्पनेची पूर्तता करण्यासाठी कायदा बदलणे नसून, त्याचा अर्थ लावणे आणि तो लागू करणे, हे आहे[13] . न्यायालय हे कायद्यात जे शब्द दिलेले नाहीत त्यांची भर घालू शकत नाही किंवा ते वाचू शकत नाहीत[14] .

**२१.** या न्यायालयाच्या **अदालत प्रसाद** ( उपरोल्लेखित ) आणि **सुब्रह्मण्यम सेथुरमन** ( उपरोल्लेखित ) या न्यायनिर्णयाची बारकाईने तपासणी केल्यास असे दिसून येईल की, त्यावर पुनर्विचार करण्याची गरज नाही. आदेशिका जारी करण्याच्या आदेशाचा फेरविचार करण्याचा किंवा तो मागे घेण्याचा अंगभूत अधिकार ट्रायल कोर्टाला प्रदान करता येत नाही. वर असे गृहीत धरल्याप्रमाणे, या न्यायालयाने, कलम १३८ अन्वये दाखल तक्रारी निकालात काढण्यासाठी होणारा विलंब कमी करण्याच्या काळजीपोटी, नुकसान भरपाई देण्याव्यतिरिक्त इतर कारणांसाठी देखील आरोपींना दोषमुक्त करण्याचा अधिकार ट्रायल कोर्टाला आहे असे गृहीत धरून कलम २५८ लागू केला. तथापि, ट्रायल कोर्टाला समन्सचा पुनर्विचार/ परत मागविण्याचा अधिकार प्रदान करणाऱ्या कायद्यात झालेली सुधारणा ही, या न्यायालयाने स्थापन केलेली समिती जी, या पैलूतही लक्ष घालेल त्यांच्या शिफारशीनुसार, विचारात घेतली जाऊ शकते.

**२२.** विद्वान एमिकस क्युरी यांनी सादर केलेले आणखी एक म्हणणे हे, जर खटला चालविण्याचे अधिकारक्षेत्र हे दंडाधिकाऱ्यांना नसेल तर, आदेशिका जारी करण्याच्या आदेशाचे पुनः परीक्षण करावे हा अधिकार जो त्यांना संहितेच्या कलम ३२२ अन्वये देण्यात आलेला आहे,

---

12 फ्रँकफर्टर, "ऑफ लॉ आणि मेन : पेपर्स आणि ॲड्रेसेस ऑफ फेलिक्स फ्रँकफर्टर".

13 डुपोंट स्टील्स लिमिटेड वि. - सिर्स ( १९८० ) १ ऑल ईआर ५२९ (एचएल)

14 युनिअन ऑफ इंडिया वि. देवकी नंदन अग्रवाल १९९९ सुप (१) एससीसी ३२३

त्या अधिकाराशी संबंधित आहे . जर ट्रायल कोर्टाला असे कळविले की, सदर अधिनियमाच्या कलम १३८ अन्वये दाखल केलेल्या तक्रारींसाठी आदेशिका जारी करण्याचे अधिकारक्षेत्र त्यांना नाही तर, कार्यवाहीला स्थगिती दिली जाईल आणि हे प्रकरण मुख्य न्यायदंडाधिकाऱ्यांकडे किंवा तत्सम अधिकार क्षेत्र असलेल्या इतर न्याय दंडाधिकाऱ्यांसमोर सादर केले जाईल, यासाठी आम्ही विद्वान एमिकस क्युरी यांच्याशी सहमत आहोत.

**२३.** जरी आम्ही, या न्यायालयाने दिनांक १०.०३.२०२१ रोजी नियुक्त केलेल्या समितीकडे इतर सर्व मुद्दे ज्यांचा निर्णय इथे झाला नाही त्यांचा उल्लेख केला असला तरी, अपिलीय न्यायालये, उच्च न्यायालये आणि या न्यायालयात प्रलंबित असलेल्या कलम १३८ अंतर्गत दाखल तक्रारी हाताळणे आवश्यक आहे. आम्हाला विद्वान एमिकस क्युरी यांनी असे कळविले की, अपिलीय टप्प्यावर आणि उच्च न्यायालये आणि हे न्यायालय यांच्यासमोर प्रलंबित असलेली प्रकरणे ही मध्यस्थीद्वारे मिटविता येतात. आम्ही उच्च न्यायालयांना विनंती करतो की, अधिनियमाच्या कलम १३८ अंतर्गत दाखल केलेल्या तक्रारींमुळे उद्भवलेल्या पुनर्निरीक्षणासाठी प्रलंबित अशी प्रकरणे ओळखावी आणि त्यांचा लवकरात लवकर मध्यस्थीसाठी उल्लेख करावा. ज्या न्यायालयांमध्ये, अधिनियमाच्या कलम १३८ अन्वये दाखल तक्रारींमधील न्यायनिर्णयांविरुद्ध अपील प्रलंबित असेल त्यांना मध्यस्थीने वाद मिटवण्याचा प्रयत्न करण्याचे निर्देश द्यावेत.

**२४.** वरील सर्व चर्चेचा शेवट आम्हाला खालील निष्कर्षापर्यंत घेऊन जातो:

१) उच्च न्यायालयांना विनंती आहे की, त्यांनी दंडाधिकाऱ्यांना अशा कार्यवाहीचे निर्देश द्यावेत की, त्यांनी सदर अधिनियमाच्या कलम १३८ अन्वये दाखल तक्रारींच्या न्यायचौकशीचे समरी ट्रायलमधून समन्स ट्रायलमध्ये रूपांतर करण्यापूर्वी कारणांची नोंद करावी.

२) जेव्हा एखादा आरोपी न्यायालयाच्या अधिकारक्षेत्राबाहेर राहतो तेव्हा, अशा आरोपी विरुद्ध कार्यवाही करण्यासाठी पुरेशी कारणे शोधण्यासाठी सदर अधिनियाच्या कलम १३८ अन्वये तक्रारी प्राप्त झाल्यानंतर, चौकशी करावी लागेल.

३) संहितेच्या कलम २०२ अन्वये चौकशी करण्यासाठी, तक्रारदाराच्या वतीने साक्षीदारांची तपासणी प्रतिज्ञापत्रावर घेण्यास परवानगी देण्यात यावी. योग्य प्रकरणांमध्ये, दंडाधिकारी हे साक्षीदारांच्या तपासणीचा आग्रह न धरता, चौकशी ही कागदपत्रांच्या तपासणी पर्यंत मर्यादित ठेवू शकतात.

४) आमची अशी शिफारस आहे की, संहितेच्या कलम २१९ मधे निर्बंध असले तरीही, एखाद्या व्यक्तीने सदर अधिनियमाच्या कलम १३८ अंतर्गत १२ महिन्याच्या कालावधीत केलेल्या अनेक गुन्ह्यांविरुद्ध एकच न्यायचौकशी करावी या तरतुदीसाठी, सदर अधिनियमात योग्य त्या सुधारणा करण्यात याव्यात.

५) उच्च न्यायालयांना अशी विनंती आहे की, त्यांनी ट्रायल कोर्टाला असे कार्यवाहीचे निर्देश द्यावेत की, एकाच घडामोडीचा भाग असलेल्या कलम १३८ अन्वये दाखल केलेल्या एका तक्रारीत केलेली समन्सची बजावणी ही एकाच न्यायालयात दाखल झालेल्या सर्व तक्रारी ज्या सदर घडामोडीचा एक भाग म्हणून जारी करण्यात आलेले धनादेश नाकारल्या संदर्भात आहेत, अशा सर्व तक्रारींमध्ये समन्सची बजावणी झाली आहे असे मानावे.

६) या न्यायालयाच्या **अदालत प्रसाद** (उपरोल्लेखित) आणि सुब्रह्मण्यम सेथुरमन (उपरोल्लेखित) मधील न्यायनिर्णयात कायद्याचा अर्थ बरोबर लावण्यात आला आहे आणि आम्ही पुनरुच्चार करतो की, ट्रायल कोर्टाला समन्स बजावणी पुनर्विलोकनाचा किंवा ती मागे घेण्याचा अंगभूत अधिकार नाही. यामुळे जरी ट्रायल कोर्टाला अधिकारक्षेत्र नसल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आले तरी आदेशिका जारी करण्याच्या आदेशाचे पुनःपरीक्षण करण्याचा जो अधिकार संहितेच्या कलम ३२२ अंतर्गत ट्रायल कोर्टाला आहे त्यावर कोणताही परिणाम होत

नाही.

७)     सदर अधिनियमाच्या कलम १३८ अन्वये दाखल होणाऱ्या तक्रारींना संहितेचे कलम २५८ लागू होत नाही आणि **मीटर्स आणि इन्स्ट्रुमेंट्स** ( उपरोल्लेखित ) मधील प्रतिकूल निष्कर्ष हे कायदा बरोबर मांडत नाहीत . हा पैलू निर्णायक पणे हाताळण्यासाठी, या न्यायालयाच्या दिनांक १०.०३.२०२१ च्या आदेशाने स्थापन झालेल्या समितीने ट्रायल कोर्टाला समन्सचा पुनर्विचार/परत मागविण्याचा अधिकार प्रदान करणाऱ्या कायद्यातील सुधारणा ही, विचारात घेतली पाहिजे.

8)     इतर सर्व मुद्दे, जे एमिकस क्यूरीने त्यांच्या प्राथमिक अहवालात आणि लेखी म्हणण्यात उपस्थित केले आहेत आणि जे येथे विचारात घेतलेले नाहीत, जे वरील समितीचा चर्चेचा विषय असतील. सदर अधिनियमाच्या कलम १३८ अंतर्गत दाखल तक्रारी जलद गतीने निकाली काढण्या संबंधित इतर कोणतेही मुद्दे या समितीने विचारात घेतले पाहिजेत.

२५.   हे प्रकरण आठ आठवड्यांनंतर सुनावणीसाठी निश्चित करा. या प्रकरणी पुढील सुनावणी तीन न्यायाधीशांच्या खंडपीठासमोर होईल.

२६.   विद्वान वरिष्ठ वकील श्री. सिद्धार्थ लुथरा आणि विद्वान वकील श्री. के. परमेश्वर यांनी एमिकस क्युरी म्हणून नियुक्ती केलेल्या मौल्यवान मदतीबद्दल आम्ही आमचे कौतुक करतो.

...................... भारताचे सरन्यायाधीश

[ एस. ए. बोबडे ]

..................................

न्या. [ एल. नागेश्वरा राव ]

..................................

न्या. [ बी. आर. गवई ]

..................................

न्या. [ ए. एस. बोपण्णा ]

........................................

न्या.  एस. रवींद्र भट

नवी दिल्ली,

१६ एप्रिल, २०२१

- - - - - - -

**अस्वीकरण**

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

x-x-x-x